जा.क्र.नांवाशमनपा/नसका/CR-१२१ /२०१६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:-२६/०२/२०१६

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

दि.२९.२.२०१६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या नांवामनपा सर्वसाधारण सभेची पुरवणी विषय पत्रिका

विषय क्र.१

दि.२४.३.२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. (अंदाजपत्रकीय विशेष सभा) दुपारी ३.०० वा..दि.२७.३.२०१५, दि.३१.३.२०१५ रोजी सकाळी ११.०० वा.व साय.४.०० वा. (अंदाजपत्रकीय विशेष सभा), दि.२८.४.२०१५ .(महापौर उपमहापौर निवडणूक विशेष सभा) दि.४.६.२०१५, दि.७.७.२०१५ ( विशेष सभा) दि.२७.८.२०१५ दि.३१.१०.२०१५ व दि.३०.११.२०१५ रोजी झालेल्या मागील सभेच्या इतिवृत्तास कायम करणे बाबत

विषय क्र.२

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग क्र. संकिर्ण-१११६/प्र.क्र.२२/नवि-२० दि.१३ जानेवारीचे २०१६ चे परिपत्रकानूसार महानगरपालिकांच्या अधिनियमांच्या कलम ४५१ मधील तरतूदीनुसार करावयाच्या कार्यवाही बाबत चे परिपत्रकाची नोंद घेणे बाबत. .(सोबत शासन परिपत्रक जोडले आहे.)

विषय क्र.३

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग क्र. संकिर्ण-१११६/प्र.क्र.२२/नवि-२० दि.२३ फेब्रूवारी २०१६ चे परिपत्रकानूसार महानगरपालिकांच्या अधिनियमांच्या कलम ४५१ मधील तरतूदीनुसार करावयाच्या कार्यवाही बाबत चे परिपत्रकाची नोंद घेणे बाबत.(सोबत शाससन परिपत्रक जोडले आहे.)

विषय क्र.४

महाराष्ट्र शासन निर्णय नगरविकास विभाग क्र. नावाशमनपा-२०१५/प्र.क्र.२०/नवि-२४ दि.२३ फेब्रूवारी २०१६ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हृध्दीत आयात होणा-या मालावर स्थानिक संस्था कर रध्द करण्याची तसेच यावर पर्याय म्हणून जकात कर व मुल्यावर्धीत कर आकारण्यात येवू नये अशी शिफारस करण्यात आलेला नांवामनपाकेचा ठराव क्र.५२ दि.१९.७.२०१४ हा ४५१(१) नुसार प्रथमत: एका महिण्याच्या कालावधीसाठी विखंडीत करण्यात आलेला आहे. .(सोबत शासन निर्णय जोडला आहे.)

विषय क्र.५

शासन निर्णय क्र. मभवा-१११५/प्र.क्र.४२/सेवा-९ दि.५ फेब्रूवारी २०१६ नुसार नांवामनपाकेतील पात्र कर्मचा-यांना दि.१ फेब्रूवारी २०१६ पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतनावरील अधिक ग्रेड पे ११९ या दराने महागाई भत्ता लागू करणेची प्रशासकीय व आर्थिक मान्यता नांवामनपा आदेश प.क्र.नांवाशमनपा/लेवि/१३७१५/२०१६ दि.२० फेब्रूवारी २०१६ अन्वये देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

विषय क्र.६

महाराष्र शासन सार्वजनीक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांकः उष्माघात 2015/प्र.क्र.223/अ-5 तारीखः 19 ऑक्टोंबर, 2015 चे परिपत्रकानुसार राज्यातील नागपूर,चंद्रपूर, गोंदीया,अकोला, नांदेड व जळगाव या जिल्ह्यात/ महानगरपालिका क्षेत्राकरीता उष्माघात कृती अराखडा (Heat Action Plan) अमलबजावणी करणेबाबत
(सोबत शाससन परिपत्रक जोडले आहे.)

विषय क्र. ७

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग,शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण -2015/ प्र.क्र. 80/ नवि-16 तंत्रालय, मुंबई-32 दिनांक 17 नोव्हेंबर 2015 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील महानगरपालिकाक्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत ``प्रभाग क्र. 5 मध्ये मुलभुत सुविधा विकास कामे करण्यासाठी`` महानगरपालिकेस रु.2.10 कोटी वितरीत करण्यात आले असुन महापालिकेचा तेवढाच सहभाग रु. 2.10 कोटी असे एकुण रु.4.20 कोटी रक्कमेतुन मुलभुत सोई सुविधा पुरविणे अंतर्गतची कामे प्रस्तावित करण्यात येत असुन शासन निर्णय क्र. जीईएन-2008/ प्र.क्र.08/ नवि-16 मुंबई 32 दिनांक 29 ऑगष्ट 2008 नुसार जिल्हास्तरीय समितीकडे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावयाचा आहे.

मुलभूत संविधाच्या विकासाठी रु.4.20 कोटीच्या प्रस्तावित कामाच्या प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी मार्फत जिल्हास्तरीय समितीकडे मान्यतेसाठी पाठविण्यास व शासन निर्णय नुसार महानगरपालिकेच्या 50 % हिश्याची रक्कम रु.2.10 कोटी महानगरपालिकेत निधी उपलब्धते नुसार वर्ग करुन प्राधाण्याने कामे हाती घेण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

विषय क्र.८

**सर्वासाठी घरे** संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास **योजना** केंद्र शासनाने दि.25.06.2015 रोजी व त्याअनुषंगाने राज्यशासनाने महाराष्ट्रातील 51 शहरांमध्ये सदर योजना राबविण्यासाठी शासन निर्णय क्र.प्रआयो.2015/प्र.क्र.110/गृनिधो-2(सेल) दि.09.12.2015 अन्वये मंजुरी प्रदान केली आहे. सदर योजनेमध्ये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार सदर योजना महानगरपालिका क्षेत्रांमध्ये राबविणे आवश्यक आहे. सदर योजनेची खालील प्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे.

**केंद्रशासनाचा अंमलबजावणी विभाग:-** गृहनिर्माण व नागरी गरिबी निर्मुलन मंत्रालय, नवी दिल्ली.

**राज्य शासनाचा अंमलबजावणी विभाग:-** गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.